# प्रसिद्धी पत्रक (Press Note) दिनांक-१७.०६.२०२६

डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आणि सायबर फसवणुकीला बळी पडलेल्या नागरिकांना त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने (I4C) एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'I4C' द्वारे 'तक्रार निवारण यंत्रणा' (GRM - Grievance Redressal Mechanism) आणि 'मनी रिस्टोरेशन मॉड्यूल' (MRM - Money Restoration Module) ही दोन अद्ययावत डिजिटल पोर्टल्स सुरू करण्यात आले आहेत.

या दोन्ही पोर्टल्सच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुंबई कार्यक्षेत्रातील सर्व सायबर पोलीस ठाण्यांसह सर्व स्थानिक पोलीस ठाण्यांमधील अधिकारी व अंमलदार यांचे पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. या सुविधेमुळे आता देश पातळीवर पोलीस (तपास यंत्रणा), बँका (आर्थिक संस्था), आणि राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टल (NCRP)यांच्यात थेट समन्वय साधला जाणार असून, निश्चित कालमर्यादेत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

**१. ग्रीव्हन्स रिडरेसल मेकॅनिझम (GRM) पोर्टल:** चुकीच्या पद्धतीने फ्रीज झालेली बँक खाती होणार सुरू सायबर गुन्ह्यांच्या तपासादरम्यान अनेकदा संशयावरून किंवा तांत्रिक कारणांमुळे काही निष्पाप नागरिकांची बँक खाती 'होल्ड' (Lien) किंवा 'फ्रीज' (Freeze) केली जातात. अशा खऱ्या खातेदारांची अडचण दूर करण्यासाठी 'GRM' पोर्टल कार्यरत राहील.

- **पारदर्शक आणि गतिमान पद्धत:** चुकीच्या पद्धतीने फ्रीज झालेल्या खात्यांबाबत तक्रार निवारण करण्यासाठी ही एक कालमर्यादित आणि उत्तरदायी यंत्रणा आहे.
- **अखंड समन्वय:** खातेदार, बँक आणि पोलीस यांच्यात थेट समन्वय साधून खऱ्या खातेदाराला त्याची बाजू मांडण्याची न्याय्य संधी याद्वारे मिळते.
- **बहुस्तरीय नियंत्रण (Multi-Level Review):** या प्रक्रियेत बँक अधिकारी, तपास अधिकारी (IO), जिल्हा/राज्य तक्रार निवारण अधिकारी (GRO) आणि थेट केंद्रीय गृह मंत्रालय (MHA) स्तरावरून देखरेख ठेवली जाते. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (VC) पडताळणी करून पात्र खाती त्वरित 'अनफ्रीज' करण्याचा निर्णय घेतला जातो.

**२. मनी रिस्टोरेशन मॉड्यूल (MRM):** फसवणुकीची रक्कम त्वरित बँक खात्यात परत मिळणार नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल (NCRP-CFCFRMS) अंतर्गत समाविष्ट असलेले हे मॉड्यूल सायबर फसवणुकीतील बळी ठरलेल्या नागरिकांना त्यांचा हक्काचा पैसा कायदेशीर व स्वयंचलित (Automated) पद्धतीने परत मिळवून देण्यासाठी विकसित करण्यात आले आहे.

- **विलंबाला लगाम:** पूर्वी न्यायालयाच्या आणि बँकांच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे जप्त केलेली रक्कम बँकेतच पडून राहायची. 'MRM' मुळे आता डिजिटल कार्यप्रणालीद्वारे हा पैसा थेट पीडिताच्या खात्यात वर्ग केला जाईल.
- **स्तरांवर रीअल-टाइम समन्वय:** पीडित नागरिक (Victim), तपास अधिकारी (IO), लाभार्थी बँक (Beneficiary Bank) आणि पीडिताची बँक (Victim Bank) यांच्यात एकाच वेळी ताळमेळ ठेवून ही रक्कम हस्तांतरित केली जाते.

- **अचूक वाटप प्रणाली:** एकाच खात्यावर अनेक तक्रारी असल्यास, कायदेशीर तरतुदींनुसार (Section 106 BNSS) पडताळणी करून किंवा प्रमाणशीर (Pro-rata) पद्धतीने सर्व पीडितांना त्यांच्या रकमेचे योग्य वाटप केले जाते.

➢ सायबर गुन्हयात फसवणूक झालेली रक्कम त्वरित मिळविण्यासाठी "रक्कम पुर्नसंचयित मॉडयुल **(Money Restoration Module)"** या पोर्टलव्दारे ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली असून त्यासाठी आपण स्वतः अथवा पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष भेट देवून पोलीसांच्या मदतीने या पोर्टलवर अर्ज सादर करावा.

**Money Restoration या प्रक्रियेमध्ये पिडीत / तक्रारदार यांची सायबर फसवणूक झालेली रक्कम ज्या बँक खात्यात गेली असेल त्या बँकेकडून रिस्टोरेशनची रक्कम अपडेट केली असेल तरच सदर प्रक्रिया पूर्ण होईल अन्यथा No Data Found दिसून येईल. अशा वेळी नागरिकांनी बँकेकडून Restoration update ची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाट पाहावी.**

➢ तसेच ज्या व्यक्तिंचे बँक खाते सायबर फसवणूकीच्या गुन्हयात फिज अथवा लिन मार्क करण्यात आलेले आहे त्यांनी त्यांच्या बँक खात्याच्यो शाखेत जावून बँक अधिकारी यांच्या मार्फतीने तकार निवारण मॉडयूल **(Grievance Redressal Module)** च्या माध्यमातून आपली तक्रार नोंदवून बँक खाते अनफिज करून घ्यावयाची प्रक्रिया करावी.

### ➢ सायबर फसवणूक झाल्यास त्वरित काय करावे?

जर आपली कोणतीही सायबर किंवा ऑनलाईन आर्थिक फसवणूक झाली, तर पहिले पाऊल म्हणून त्वरित **'१९३०' (1930) या राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांकावर** संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तात्काळ तक्रार नोंदवावी.

घटना घडल्यापासूनच्या पहिल्या **'गोल्डन अवर' (Golden Hour - म्हणजेच पहिल्या काही तासांत)** नोंदवलेली तक्रार बँकिंग चॅनलमधील फसवणुकीची रक्कम तातडीने ब्लॉक करण्यास मदत करते, ज्यामुळे 'MRM' द्वारे ती रक्कम परत मिळणे अत्यंत सोपे होते.

### ➢ नागरिकांना जाहीर आवाहन

सायबर गुन्ह्यांमध्ये फसलेली रक्कम पिडीत नागरिकांपर्यंत सुलभ व पारदर्शकपणे परत पोहोचावी यासाठीच ही अत्याधुनिक डिजिटल व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे. मुंबई पोलीस नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस उपायुक्त (सायबर गुन्हे) यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सायबर फसवणूक झाल्यास घाबरून न जाता किंवा कोणत्याही दबावाला बळी न पडता, तात्काळ 1930 टोल फ्री हेल्पलाईन वर कॉल करावा. तसेच आवश्यकतेनुसार या दोन्ही नवनवीन पोर्टल्सचा आणि हेल्पलाईनचा जास्तीत जास्त वापर करावा.

**- मुंबई पोलिस (सायबर गुन्हे विभाग)**